Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education Kolhapur Divisional Board Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.को.वि.मं/डी.पी / 118
दिनांक : 08.01.2026

प्रति,

**प्राचार्य व मुख्याध्यापक,**
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रु/ मार्च २०२६ साठी मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी करावयाच्या परीक्षापूर्व कार्यवाहीबाबत.**
**संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कोविमं/सहविचार सभा/2025-26/4481 दि.17/12/2025 रोजीचे पत्र.**
**२. प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या सहविचार सभेत देण्यात आलेल्या सूचना.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा.अध्यक्ष, राज्यमंडळ पुणे यांच्या निर्देशानुसार मुख्याध्यापक व प्राचार्य यांची जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या समवेत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दि. 23/12/2025, सातारा जिल्ह्यामध्ये दि. 26/12/2025 तर सांगली जिल्ह्यामध्ये दि.30/12/2025 रोजी इ.१०वी व इ.१२वी परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ परीक्षा संचालनाबाबत व पूर्व तयारीबाबत ऑफलाईन सहविचार सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर सभेमध्ये इ. १०वी व इ.१२वी परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ परीक्षेसंदर्भात मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे स्तरावर करावयाच्या कार्यवाही संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) जिल्हास्तर सहविचार सभेमध्ये दिलेल्या सुचनांनुसार या पत्रासोबत PPT (Power Point Presentation.) पाठविण्यात येत आहे. त्याचे अवलोकन करुन आवश्यक ती कार्यवाही विहित वेळेत करण्यात यावी.

२) शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांची अभ्यासाची उजळणी घेणे, सराव घेणे व उद्‌बोधन वर्ग घेणे या संदर्भात नियोजन करुन प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी.

३) इ.१०वी व इ.१२वी परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची बैठक **दि.०८/०१/२०२६ ते दि. १३/०१/२०२६** या कालावधीत कोणत्याही एका दिवशी आयोजित करुन विभागीय मंडळाने पुरविलेल्या PPT च्या सहाय्याने योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. शिवाय शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर वर्षभरात केलेले कामकाज आणि उपक्रम यांचीही माहिती आपल्याकडील PPT च्या सहाय्याने द्यावी. तसेच कॉपीमुक्त अभियानाबाबत उद्बोधन करावे. या बैठकीचे उपस्थितीपत्रक व इतिवृत्त जतन करुन ठेवावे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

४) बैठकीत विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंबंधिच्या शिक्षासुचीचे व उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठामागील सूचनांचे वाचन करण्यात यावे. तसेच मंडळाने सुचविलेल्या नमुन्यातील परीक्षेत गैरमार्ग करणार नाही अशा आशयाची शपथ / प्रतिज्ञा शाळास्तर / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर अद्याप दिली नसल्यास विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

५) राज्यमंडळाने मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे सोयीसाठी MSBSHSE हे Android Mobile Application विकसित केले असून सदर मोबाईल ॲप Google Play Store मधून Download करुन घेण्याबाबत बैठकीत सूचना देण्यात याव्यात.

६) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क, शिक्षक पॅनल माहिती, सांकेतांक नुतनीकरण शुल्कासह प्रस्ताव याची पुर्तता अद्याप केली नसल्यास दोन दिवसात करावी. नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क, शिक्षक पॅनल याची पुर्तता मुदतीत न झाल्यास परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे अशा शाळांना उपलब्ध होणार नाहीत. त्याची जबाबदारी संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांवर निश्चित होईल. त्यामुळे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संभाव्य शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी मुख्याध्यापक व प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

७) दिव्यांग विद्यार्थी प्रस्ताव, आवेदनपत्र रद्द प्रस्ताव, चित्रकला / शास्त्रीय कला / लोककला प्रस्ताव, खेळाडू प्रस्ताव, अतिविलंब आवेदनपत्रे इ. मंडळ कार्यालयास विहित मुदतीत सादर करावेत.

८) विभागीय मंडळाने जिल्हास्तरावर विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्याकरिता ऑनलाईन उद्‌बोधन वर्ग आयोजित केल्यास शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांसह परीक्षेशी संबंधित घटकांनी त्या कार्यक्रमास उपस्थित राहणे आवश्यक राहील.

९) विभागीय मंडळाकडून शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांसाठी यथा समय आवश्यकतेनुसार ऑनलाईन सभा आयोजित करण्यात येतील. त्यास शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी आवश्यक माहितीसह स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१०) परीक्षा केंद्र असलेल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी आवश्यक सुविधा अद्यावत करणे. यामध्ये वर्गखोल्या व शाळेच्या आवारात CCTV कॅमेरे असल्यास ते सुरु ठेवणे. आवश्यक संख्येइतके बेंचेस, वीजदिवे, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहाची उपलब्धता, संरक्षण भिंत, खिडक्यांची दुरुस्ती व जाळी बसविणे, वीजेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर अथवा इनव्हर्टर इ. यांची उपलब्धता दि.१५/०१/२०२६ पर्यंत करणे अनिवार्य राहिल. विभागीय मंडळ अधिकारी अथवा वरिष्ठ अधिकारी या कालावधीत आकस्मित भेट देतील. या कालावधीनंतर उपरोक्त सुविधांची उपलब्धता आढळून न आल्यास संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

११) राज्यमंडळाच्या व विभागीय मंडळाच्या संकेतस्थळास नियमितपणे भेट द्यावी. शिवाय MSBSHSE या मोबाईल ॲपचा वेळोवेळी उपयोग करावा.

(सुभाष रा.चौगुले)<br>
**विभागीय सचिव,**<br>
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबतः-**

१. बैठकीसाठी आवश्यक असलेली PPT (Power Point Presentation.)

२. आवश्यक शासन निर्णय व परिपत्रकांचे फोल्डर (Zip File)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर मा. सचिव, राज्य मंडळ कार्यालय, पुणे.**

**प्रत कार्यवाहीस्तवः-** १. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कार्यालय, सातारा, सांगली व कोल्हापूर.